क्र. पोमसं/३-अ/सेप्रनि/श्वान पथक/११६/२०११

मुंबई, दि. १८ /०७/२०२३

**विषय** :- पोलीस दलाच्या श्वान पथकातील पोलीस निरीक्षक व वरिष्ठ श्वान शिक्षक, गट -अ (राजपत्रिक), पोलीस उप निरीक्षक व श्वान शिक्षक, गट -ब (अराजपत्रित), पोलीस हवालदार (श्वान पथक), गट - क (सेवाप्रवेश) नियम, २०२३.

******

**परिपत्रक :-**

महाराष्ट्र शासन, राजपत्र, असाधारण भाग चार-ब, गृह विभाग दि.३०/०६/२०२३ अन्वये पोलीस दलाच्या श्वान पथकातील पोलीस निरीक्षक व वरिष्ठ श्वान शिक्षक, गट -अ (राजपत्रित), पोलीस उप निरीक्षक व श्वान शिक्षक, गट -ब (अराजपत्रित), पोलीस हवालदार (श्वान पथक), गट - क (सेवाप्रवेश) नियम, २०२३ मंजुर करण्यात आले आहेत. सदर सेवाप्रवेश नियम महाराष्ट्र शासनाच्या www.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर view gazettes या शिर्षाखाली उपलब्ध आहेत.

२. तरी, खालील घटक प्रमुख यांना विनंती करण्यात येते की, पोलीस दलाच्या श्वान पथकातील पोलीस निरीक्षक व वरिष्ठ श्वान शिक्षक, गट -अ (राजपत्रित), पोलीस उप निरीक्षक व श्वान शिक्षक, गट -ब (अराजपत्रित), पोलीस हवालदार (श्वान पथक), गट - क (सेवाप्रवेश) नियम, २०२३ मधील तरतुदीनुसार योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

K M Prasanna

**(के.एम.मल्लिकार्जुन प्रसन्ना )**
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना)
पोलीस महासंचालक यांचेकरिता.

प्रति,

पोलीस आयुक्त बृहन्मुंबई / ठाणे शहर (सस्नेह)
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व परिक्षेत्रिय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्ग सह)
सर्व पोलीस अधीक्षक (लोहमार्ग सह)

प्रत,

पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महासंचालक, कार्यालय, म.राज्य, मुंबई.

२/- पोलीस उप अधीक्षक यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन राजपत्राची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर पोलीस दलाच्या श्वान पथकातील पोलीस निरीक्षक व वरिष्ठ श्वान शिक्षक, गट -अ (राजपत्रित), पोलीस उप निरीक्षक व श्वान शिक्षक, गट -ब (अराजपत्रित), पोलीस हवालदार (श्वान पथक), गट - क (सेवाप्रवेश) नियम, २०२३ या विषयाखाली कायमस्वरुपी उपलब्ध करुन देण्यात यावी.

कार्यासन अधिकारी, का.क्र. १४-अ / ३६

RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ९, अंक ९१(२)] शुक्रवार, जून ३०, २०२३/ आषाढ ९, शके १९४५ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक २५१**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### गृह विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २८ जून, २०२३.

**आदेश**

**महाराष्ट्र पोलीस अधिनियम.**

क्रमांक डीजीओ-०८१६/प्र.क्र.३०१/पोल-४.— महाराष्ट्र पोलीस अधिनियम (१९५१ चा २२) याच्या कलम ५ (ब) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा, आणि त्याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, आणि याबाबतीत काढलेले विद्यमान सर्व नियम, आदेश किंवा अनुदेश यांचे अधिक्रमण करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे,महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाच्या अंतर्गत असलेल्या पोलीस दलाच्या श्वान पथकातील पोलीस निरीक्षक व वरिष्ठ श्वान शिक्षक, गट-अ (राजपत्रित), पोलीस उप निरीक्षक व श्वान शिक्षक, गट- ब (अराजपत्रित), पोलीस हवालदार (श्वान पथक), गट-क या पदांच्या सेवाप्रवेशाचे विनियमन करणारे पुढील नियम करीत आहेतः

१. या नियमांस, पोलीस दलातील श्वान पथकातील पोलीस निरीक्षक व वरिष्ठ श्वान शिक्षक, गट-अ (राजपत्रित), पोलीस उप निरीक्षक व श्वान शिक्षक, गट-ब (अराजपत्रित), हवालदार (श्वान पथक), गट-क (सेवाप्रवेश) नियम, २०२३ असे म्हणावे.

२. या नियमांत, संदर्भानुसार दुसरा अर्थ आवश्यक नसेल तर,—

(क) "विभाग" याचा अर्थ, महाराष्ट्र शासनाचा गृह विभाग,असा आहे;

(ख) "महासंचालक" याचा अर्थ, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई, असा आहे;

(घ) "शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे;

(ङ) "पोलीस दल" याचा अर्थ, महाराष्ट्र पोलीस अधिनियमान्वये घटित केलेले पोलीस दल, असा आहे;

(च) "पोलीस पथक प्रमुख" याचा अर्थ, विविध पोलीस आयुक्त कार्यालयाचा प्रमुख आणि जिल्हा पोलीस अधीक्षक प्रमुख, असा आहे;

३. श्वान पथकातील पोलीस निरीक्षक व वरिष्ठ श्वान शिक्षक, गट अ (राजपत्रित), या पदावरील नियुक्ती, पोलीस उप निरीक्षक व श्वान शिक्षक, गट ब (अराजपत्रित) या पदावर तीन वर्षापेक्षा कमी नसेल इतकी नियमित सेवा असणाऱ्या उक्त पद धारण करणाऱ्या योग्य व्यक्तींमधून योग्यतेस अधीन राहून, ज्येष्ठतेच्या आधारे, योग्य व्यक्तीच्या पदोन्नतीने करण्यात येईल.

४. "श्वान पथकातील पोलीस उप निरीक्षक व श्वान शिक्षक, गट ब (अराजपत्रित) या पदावरील नियुक्ती, पोलीस हवालदार (श्वान पथक), गट-क या पदावर तीन वर्षापेक्षा कमी नसेल इतकी नियमित सेवा असणाऱ्या उक्त पद धारण करणाऱ्या योग्य व्यक्तींमधून योग्यतेस अधीन राहून, ज्येष्ठतेच्या आधारे, योग्य व्यक्तीच्या पदोन्नतीने करण्यात येईल.

५. (एक) श्वान पथकातील पोलीस हवालदार (श्वान पथक), गट क या पदावरील नियुक्ती, ज्याने पोलीस शिपाई किंवा पोलीस नाईक किंवा पोलीस हवालदार या पदावर तीन वर्षापेक्षा कमी नसेल इतकी नियमित सेवा पूर्ण केली आहे व जो शारीरिकदृष्ट्या सुदृढ आहे, आणि संगणक हाताळणी प्रमाणपत्र धारण करीत आहे, चांगला सेवाभिलेख आहे, कोणतीही गंभीर शिक्षा भोगलेली नाही आणि चांगला गोपनीय अहवाल आहे अशा इच्छुक उमेदवारांमधून पोलीस पथक प्रमुखामार्फत निवडीद्वारे करण्यात येईल.

(दोन) श्वान पथकातील पोलीस हवालदार (श्वान पथक), गट-क या पदावरील नियुक्ती, गुन्हे अन्वेषण विभाग पुणे येथे आयोजित केलेले मूलभूत प्रशिक्षण (बॉम्बशोधक व अंमलीद्रव्ये यामधील सहा महिन्यांचे आणि भारतीय दंड संहिता गुन्हे शोधाबावतचे नऊ महिन्यांचे) यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर करण्यात येईल.

(तीन) संबंधित पोलीस पथक प्रमुख, त्याच्या जिल्ह्यातील इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागवील. अर्ज प्राप्त झाल्यानंतर संबंधित पोलीस पथक प्रमुख, अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकानुसार संबंधित पोलीस कर्मचाऱ्यांची प्रतीक्षा सूची तयार करील आणि उपलब्ध रिक्त जागांनुसार त्यांना मूलभूत प्रशिक्षणासाठी पाठवील. जे उमेदवार यशस्वीरित्या प्रशिक्षण पूर्ण करतील त्या उमेदवारांची श्वान पथकामध्ये हवालदार (श्वान पथक) म्हणून नियुक्ती करण्यात येईल.

६. कार्यकारी दलात परत पाठविल्यावर, हवालदार (श्वान पथक), परत पाठविल्याच्या दिनांकास त्याची ज्येष्ठता गमावील आणि जर त्यानंतर हवालदार (श्वान पथक) पदावर पुन्हा पदाधिष्ठित केला असेल तर, नवीन नियुक्तीच्या दिनांकास असलेली ज्येष्ठता त्याला मिळेल. जर हवालदार (श्वान पथक), पोलीस दलात परत आला असेल तर, त्याची ज्येष्ठता निश्चित करताना, संबंधित पथक प्रमुख, त्याच्या नियुक्तीच्या दिनांकापासून पोलीस शिपाई म्हणून त्याची नियुक्ती करील.

७. श्वान पथकामध्ये पोलीस निरीक्षक व वरिष्ठ श्वान शिक्षक, गट अ (राजपत्रित), पोलीस उप निरीक्षक व श्वान शिक्षक, गट ब (अराजपत्रित) आणि हवालदार (श्वान पथक), गट- क, म्हणून नियुक्ती केलेला उमेदवार, मुंबई पोलीस नियमावली, १९५१, मुंबई पोलीस (शिस्त व अपील) नियम, १९५६ आणि महाराष्ट्र शासन, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य आणि अप्पर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी वेळोवेळी काढलेले नियम व आदेश यांच्या तरतुदींचे पालन करील.

८. नियम ३ व ४ मध्ये नमूद केलेल्या पदांवर नियुक्त केलेली व्यक्ती, महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही श्वान पथकामध्ये बदलीस पात्र असेल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**कैलास गायकवाड,**
शासनाचे सहसचिव.

## HOME DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 28th June, 2023.

### Order

MAHARASHTRA POLICE ACT.

No.DGO-0816/C.R.301/Pol-4.— In exercise of the powers conferred by clause *(b)* of section 5 of the Maharashtra Police Act (XXII of 1951), and all other powers enabling it in this behalf, and in suppression of all existing rules, orders or instruments made in this behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules regulating recruitment to the post of Police Inspector and Senior Dog Master, Group-A, (Gazetted), Police Sub-Inspector Dog Master, Group-B (Non-Gazetted), Head Constable (Dog Squad), Group - C, in Dog Squad Unit of police force under the Home Department, Government of Maharashtra namely ;

**1.** These rules may be called as the Police Inspector and Senior Dog Master, Group-A (Gazetted), Police Sub Inspector and Dog Master, Group-B (Non- Gazetted), Head Constable (Dog Squad), Group-C, in Dog Squad unit of police force Recruitment Rules, 2023.

**2.** In these rules; unless the context require otherwise :—

(a) "Department" means the Home Department of Government;

(b) "Director General" means the Director General of Police, Maharashtra State, Mumbai.

(c) "Government" means the Government of Maharashtra;

(d) "Police Force" means the Police Force constituted under Maharashtra Police Act.

(f) "Unit Police Head" means head of different Police Commissioner Office and head of District Superintendent of Police.

**3.** The appointment to the post of Police Inspector and Senior Dog Master, Group-A (Gazetted) in Dog Squad Unit shall be made by promotion of suitable person on the basis of seniority subject to fitness from among the person holding the post of Police Sub-Inspector Dog Master, Group-B (Non Gazetted) for not less than three years of regular service in that post.

**4.** The appointment to the post of Police Sub-Inspector Dog Master, Group-B (Non-Gazetted) in Dog Squad Unit shall be made by promotion of suitable person on the basis of seniority subject to fitness from among the person holding the post of Head Constable (Dog Squad), Group -C, for not less than three years of regular service in that post.

**5.** (i) The appointment to the post of Head Constable (Dog Squad), Group -C, in Dog Squad Unit shall be made by selection by the Unit Police Head from amongst the willing candidate who have completed not less than three years of regular service on the post of Police Constable or Police Naik or Police Head Constable and is physically fit, possess certificate in Computer Operation, have good service record, do not suffer any serious punishment and have good confidential records.

(ii) The appointment to the post of Head Constable (Dog Squad), Group C, in Dog Squad Unit shall be made after successful completion of the Basic Training (Six months for Bomb detection and Narcotics and Nine months for IPC crime detection) conducted at Crime Investigation Department, Pune.

(iii) The concern Unit Police Head shall invite the application from the willing candidate in his district. After receiving the application, the concern Unit Police Head shall prepare the waiting list of the concerned police personel as per the date of receiving application and send them for basic training as per the available vacancies. The candidates who have successfully completed the training shall be appointed as Head Constable (Dog Squad), in Dog Squad Unit.

**6.** On repatriation to the executive Police force, the Head Constable (Dog Squad) shall loose his seniority on date of repatriation and if inducted subsequently again on the post of Head Constable

(Dog Squad) then he shall get seniority of the date of new appointment. If the Head Constable (Dog Squad) returns to the police force, while determining his seniority, the concerned unit chief shall appoint him from the date of his appointment as a police constable.

**7.** The Candidate appointed as Police Inspector and Senior Dog Master, Group-A (Gazetted), Police Sub-Inspector Dog Master, Group-B (Non-Gazetted) and lead Constable (Dog Squad), Group -C, in the Dog Squad Unit shall be abide by the provisions of Mumbai Police Manual, 1951, Mumbai Police (Discipline and Appeal) Rules, 1956 and Rules and orders issued by Government of Maharashtra, Director General of Police, Maharashtra State, and Additional Director General of Police, Crime Investigation Department, Maharashtra State. Pune from time to time.

**8.** A person appointed to the post mentioned in rules 3 and 4 shall be eligible for transfer to any of the Dog Squad Units in Maharashtra.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

KAILAS GAIKWAD,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.